**निशानी क्र. ५५ वरील आदेश**

१. सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम आदेश ६ नियम १७ नुसार दुरूस्ती करिता दाखल केली आहे.

२. वादीचे अर्जातील कथन असे आहे की, प्रतिवादी क्र. ३ याने दाव्याचे कामी कैफियत दाखल केलेली आहे. प्रतिवादीचे म्हणण्यानुसार दावा मिळकतीमधील दुकान त्याचे नसून त्याची भावजयी सौ. उषा द्वारकानाथ मोरे यांचे मालकीचे आहे. प्रतिवादीचे कैफियतीतील कथनामुळे उषा द्वारकानाथ मोरे यांना दाव्याचे कामी पक्षकार करणे व त्याअनुषंगाने दाव्यात दरूस्ती करणे आवश्यक झाले आहे. या दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे प्रतिवादी उषा द्वारकानाथ मोरे यांना प्रतिवादी क्र. १० म्हणून दाव्यात समावेश करावे व त्याअनुषंगाने दाव्यात दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी. अशी विनंती केली.

३. प्रतिवादी क्र. ३ यांनी अर्जाला नि. ५७ अन्वये आपले म्हणणे दाखल केले. त्यांनी असे कथन केले की, सदरची दुरूस्ती कायदयाच्या चौकटीत बसणारी नाही. सदर दुरूस्ती मंजूर केल्यास दाव्याचे स्वरूप बदलणार आहे. सबब दुरूस्ती अर्ज फेटाळण्यात यावा.

४. सदरचा दावा वादी यांनी अतिक्रमण हटविण्याकरिता, मालकी हक्क व ताबे कब्जाच्या ठरावाकरिता व निरंतर मनाई हुकुम मिळणे कामी दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे प्रतिवादी क्र. ३ ने नि. क्र. २३ वर कैफियत दाखल केलेली आहे. या कैफियतीतील परिच्छेद ६ मध्ये वाद मिळकतीतील दुकानाचे मालक त्यांची भावजयी सौ.उषा द्वारकानाथ मोरे या असल्याचे कथन आहे. यामुळे सदर दाव्यात दुरूस्ती होणे आवश्यक आहे. या दुरूस्तीने दाव्याचे विनंती परिच्छेद मध्ये किंवा दाव्याचे स्वरूपात कोणताही बदल होत नाही. म्हणून मी खालील आदेश पारित करित आहे.

CNR No. MHRG-08000476-2019 रे. मु. न. ४२/२०१९
नि. क्र. ५५

**आदेश**

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो .

२. वादींनी विहित मुदतीत दुरूस्ती करून दुरूस्त प्रत दाखल करावी.

WABALE RAMDAS DAULAT Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT Date: 2022.01.04 14:50:09 +0530

दि. ०१.०१.२०२२ (आर. डी वाबळे)

खालापूर दिवाणी न्यायाधिश क. स्तर खालापूर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : M. S. Shirgire, Steno. (L.G.) |
| (b) | Court | : Shri. R. D. Wabale<br>C.J.J.D. & J.M.F.C.,<br>Khalapur |
| (c) | Date of Judgment/Order | : 01/01/2022 |
| (d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : 01/01/2022 |
| (e) | Judgment/Order uploaded on | : 04/01/2022 |